प्रकरण ७

कर्मवाद

भारत ही तत्वज्ञानाची क्रीडाभूमी आहे. या पुण्यभूमीवर अनादिकालापासून आध्यात्मिक चिंतन व तत्वज्ञानाची विचारधारा वाहत आहे. न्याय, सांख्य, वेदान्त, वैशेषिक, मीमांसक, बौद्ध जैन आदि अनेक तत्वज्ञानांनी याच ठिकाणी जन्म घेतला आहे. याच भूमीत त्याची वाढ झाली. ते विचार प्रवाह हिमालयाच्या शिखरापेक्षा उंच आणि समुद्रापेक्षा खोल आणि आकाशापेक्षाही विशाल आहेत.

भारतीय दर्शन म्हणजे जीवनाचं दर्शन आहे. केवळ सुंदर कल्पनेच्या स्वप्निल जगात वावरण्याऐवजी येथील मनस्वी दार्शनिकांनी जीवनाच्या गंभीर प्रश्नावर, चिंतन, मनन आणि विचार-विनिमय करण्याचे ठरविले. म्हणून आत्मा, परमात्मा, लोक, कर्म इ. तत्वांचे खोल चिंतन केले आहे. त्यांनी आपली तपश्चर्या आणि कुशाग्र बुद्वीच्या मदतीने केलेले चिंतन म्हणजे भारतीय तत्वज्ञानाच मेरुदंड आहे. या विराट भारताची मान ताट ठेवायला ही आध्यात्मिक संपत्तीच कारणीभूत आहे. मानसिक पराधीनतेच्या चिखलात बुडालेले आधुनिक भारतीय हे पाश्चात्य संस्कृतीच्या झगझगाटाने दिपून जरी या अमोल चिंतनाची अवहेलना करीत असले तरी, त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की भारताचा गौरव हा या तत्वज्ञानावरच अवलंबून आहे. दार्शनिक वादामध्ये कर्मवादाला एक वेगळे आणि महत्त्वाचे स्थान आहे. कर्मवादाचे मर्म समजल्याशिवाय भारतीय दर्शनाचे, विशेषकरून आत्मावादाचे योग्य ज्ञान होऊ शकत नाही.

डॉ. हजारीप्रसाद द्विवेदींच्या म्हणण्याप्रमाणे कर्मफलाचा सिध्दांत हा भारताचाच विशेष आहे. पुनर्जन्माचा सिध्दांत शोधण्याचा प्रयत्न इतर विद्वानांनी देखील केला. परंतु हा सिध्दांत त्यांना कोठेही सापडला नाही.

प्राच्यविद्याविशारद कीथने इ.स.१९०९ मध्ये रॉयल एशियाटिक सोसायटीच्या पत्रिकेमध्ये एक लेख प्रसिध्द केला. त्यात ते म्हणतात भारतीयांचा कर्मसिध्दांत हा अद्वितीय आहे. त्यामुळे तो जगातील इतर तत्वज्ञानापेक्षा वेगळा ठरतो. भारतीयांच्या धर्माचा अभ्यास करू इच्छिणा-याने कर्मसिध्दांताच ा अभ्यास करायला हवा.

आत्मातत्वासंबंधी निरनिराळ्या लोकांच्या वेगवेगळ्या कल्पना आहेत. त्यामुळे कर्माच्या विवेचनासंबंधी सुध्दा वेगळेपणा आढळतो. आस्तिक स्वरुपाच्या तत्वज्ञानाने पुनर्जन्म सिध्द

करण्यासाठी कर्मसिध्दांताचा स्वीकार केला. तत्वज्ञाना - तत्वज्ञानात फरक असला तरी प्रत्येकाचा आधार मात्र तोच असतो.

जैन दार्शनिक ज्याला कर्म म्हणतात त्यालाच वेदान्त अविद्या, प्रकृती किंवा माया म्हणतात. बौध्द दर्शन वासना आणि अविज्ञप्ती म्हणतात. सांख्य व योगदर्शन त्याला आशय आणि क्लेश म्हणतात. न्याय आणि वैशेषिक दर्शन त्यालाच धर्माधर्म संस्कार आणि अदृष्ट म्हणतात. मीमांसक त्यालाच अपूर्व म्हणतात. खिस्त आणि मूसा त्याला सैतान म्हणतात. कर्म या शब्दाचे हे वेगवेगळे प्रति-शब्द आहेत.

कर्माचे स्वरूप -

कर्माचे स्वरूप म्हणजे काय आहे ? याचे उत्तर विचारकांनी वेगवेगळ्या प्रकारे दिले आहे. न्यायदर्शन अदृष्ट म्हणजे कर्माला आत्म्याचा गुण मानते. आणि त्याचे फल ईश्वराच्या माध्यामातून मिळेल असे समजतो. सांख्यदर्शन कर्माला प्रकृतीचा विकार मानते. चांगल्या-वाईट प्रवृत्तीचे स्वभावावर संस्कार होतात आणि संस्कारांनीच कर्माचे फळ मिळते. बौध्द दर्शन मनातील वासनांनाच कर्म मानतात. आणि वासना सुख-दु:खाचा मूळ हेतु आहे. मीमांसक यज्ञादी क्रियानाच कर्म म्हणतात. व्रतादी अनुष्ठानांना पौरानिक लोक कर्म मानतात. वैय्याकरणी लोक कर्ता, आतल्या क्रियेद्वारा जे मिळवू इच्छितो त्याला कर्म म्हणतात. गीता-उपनिषदे चांगल्या वाईट कार्याला कर्म म्हणतात. जैन दर्शनाप्रमाणे कर्म हे फक्त संस्कार नसून एक स्वतंत्र तत्व आहे. मिथ्यात्व, अव्रत, प्रमाद, कषाय आणि योग याद्वारे जे केल्या जाते ते कर्म होय. आत्म्याच्या राग-द्वेषात्मक क्रियामुळे आकाश-प्रदेशातील अनंतानन्त सूक्ष्म पुद्गल कर्म परमाणू चुंबकाप्रमाणे आत्म्याकडे आकर्षित होऊन, आत्म्याच्या प्रदेशाबरोबर बांधल्या जातात. गरम लोखंडाचा गोळा पाण्यात ठेवल्यावर चारी बाजूच्या पाण्याला आपणाकडे ओढून घेतो.तसेच आत्मा देखील राग-द्वेषाला वश होऊन कार्माण जातीच्या पुद्गलांना आकर्षित करतो.

कर्माचे भेद -

कर्माचे मुख्यत: दोन भेद आहेत. द्रव्यकर्म आणि भावकर्म. सांसारिक जीवांचे रागद्वेषादी वैभाविक भावकर्म होय. आणि त्या वैभाविक परिणामांनी जे कार्माण वर्गणांचे पुद्गल

आकर्षित होतात ते द्रव्यकर्म होय. द्रव्यकर्म आणि भावकर्मामध्ये निमित्त - नैमित्तक - रुप दोन प्रकारचा कार्यकारण संबंध आहे. द्रव्यकर्म कार्य आहे. आणि भावकर्म कारण आहे. हा कार्यकारण भाव कोंबडी आणि अंड्याच्या कार्याकारण भावाप्रमाणे आहे. कोंबडीपासून अंडे उत्पन्न होते म्हणून कोंबडी हे त्या अंड्याचे कारण आहे आणि अंडे हे कार्य आहे. परंतु अंड्यातून कोंबडी उत्पन्न होते म्हणजे अंडें कारण आणि कोंबडी हे कार्य आहे. अशाप्रकारे दोनही कार्य आहेत आणि दोन्ही कारण आहेत. परंतु कोंबडी आधी की अंडे या जिज्ञासेचे समाधन करणे कठीण आहे. कारण कोंबडीपासून अंडे होते आणि अंड्यापासून कोंबडी होते. म्हणून दोहोतील कार्य-कारण-संबंध स्पष्ट आहे. परंतु त्यांच्यातील पौर्वापर्य- भाव स्वष्ट करता येत नाही. संततीच्या दृष्टीने त्याच्यातील परस्पर कार्यकारणभाव अनादी आहे. द्रव्य आणि भाव कर्माचा कार्यकारण- भाव- संबंध संततीच्या अपेक्षेने अनादी आहे. दोघेही एक दुस-याचे निमित्त आहेत.

जसा मातीचा एक गोळा मडके होण्यासाठी उपादान कारण आहे. परंतु कुंभाररूपी निमित्ताच्या अभावी तो घट बनू शकत नाही. तसेच कार्माण वर्गणेत कर्मरुप होण्याची शक्ती आहे. म्हणून पुद्‌गल द्रव्य हे कर्माचे उपादान कारण आहे. पण जीवामध्ये भावकर्माची सत्ता न मानली तर स्वत: पुद्‌गल- द्रव्य कर्मात परिणत होऊ शकत नाही. म्हणून भावकर्म द्रव्यकर्माचे निमित्त कारण आहे. म्हणून द्रव्य आणि भाव हे कर्माचे कार्यकारण- भाव उपादानोपादेय रूप नसून निमित्तिक- रूप आहे. इतर दर्शनकारांनी देखील द्रव्य आणि भाव कर्माचा अनेक प्रकारच्या नावांनी स्वीकार केला आहे.

कर्माचे अस्तित्व -

या विशाल विश्वात सर्वत्र विषमता, विचित्रता आणि विविधता दिसतो. सर्व जीव स्वभावत: समान असूनदेखील त्यात मनुष्य, पशु, पक्षी, कीडा, मुंगी इ. रुपात जे अंतर दिसते त्याचे कारण काय? फक्त मनुष्यांचे जग घेतले तर कोणी श्रीमंत आहेत, कोणी गरीब आहेत, कोणी निरोगी तरी कोणी रोगी, कोणी अज्ञ तर कोणी हुशार, कोणी सबल, कोणी दुर्बल, कोणी सुंदर, कोणी कुरूप आहे, कोणी प्रासादात राहतो तर कोणी झोपडीत, कोणाला खाऊन अजीर्ण होते तर कोणाला अन्न नजरेस पण पडत नाही, कोणी बहुमूल्य वस्त्रांनी नटला आहे, तर कोणी फाटक्या चिंध्यांनी अंग झाकण्याचा प्रयत्न करीत आहे. एवढेच नव्हे तर एकाच

आईच्या कुशीतून जन्म घेणा-या पुत्रात देखील जमीन अस्मानचे अंतर असते. एक श्रीमंत तर दुसरा दरिद्री दिसतो. या फरकाचे मूळ कारण काय असावे, हे एक चिरज्वलंत प्रश्न आहे.

भारतातील विवेकी विद्वानांनी या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न करतांना म्हटले आहे - या विषमतेचे आणि विधितेचे मूळ कर्म आहे. कर्मानेच विषमता व विविधता निर्माण केली आहे. जैन सिध्दांताप्रमाणे बौध्द न्याय आणि वेदांत दर्शने देखील कर्मालाच जीवाच्य वेगवेगळ्या अवस्थांचे कारण मानतात. हा एक कसोटील उतरलेला सिध्दांत आहे की जसे बीज असेल तसाच वृक्ष निर्माण होईल.

शंभर नंबरी सोन्यामध्ये काही भेद नसतो. परंतु विजातीय तत्वाच्या मिश्रणामुळे त्यात फरक होतो. निश्चयाच्या दृष्टीने सर्व आत्मे एकच आहेत. परंतु भेद आणि विषमता दिसून येते त्याचे कारण कर्म होय.

आत्मा प्रथम की कर्म -

हाही एक प्रश्न आहे. याचे उत्तर म्हणजे दोन्ही अनादि आहेत, हेच होय. कर्मसंततीचा आत्म्याशी अनादी काळापासून संबंध आहे. असा कोणताही क्षण नाही की ज्यावेळी संसारी जीव कर्मसंबंधी निर्माण करीत नाही. यादृष्टीने आत्म्याचा कर्माशी संबंध सादी देखील म्हणता येईल. परंतू कर्मसंततीच्या अपेक्षेने आत्म्याचा कर्माबरोबर संबंध आदी आहे.

असा प्रश्न उपस्थित होऊ शकेल की हा संबंध जर अनादी आहे तर त्याचा अंत कसा होऊ शकेल? कारण जो अनादी आहे तो नाशवंत असू शकत नाही.

याचे उत्तर असे आहे की अनादी नाशवंत नसणे हा सामान्य नियम झाला. तो जातीशी संबंधित आहे. पण व्यक्ती - विशेषाला तो लागू होऊ शकत नाही. सोने आणि मातीचा, तूप आणि दुधाचा संबंध अनादी असून देखील ते वेगवेगळे आहेत. तसाच आत्मा आणि कर्म यांच्या अनादी संबंधाचा नाश होतो. व्यक्तीच्या दृष्टीने कोणतेही कर्म अनादी नाही. कोणत्याही एका विशिष्ट कर्माच्या अनादित्वाशी संबंध नाही. पूर्वी बध्द झालेली कर्मे काळ पूर्ण झाल्यावर आत्म्यापासून दूर होतात. आणि नवीन कर्माचा बंध होतो. अशा प्रकारे बदलत्या स्वरूपात आत्म्याशी कर्माचा संबंध अनादी कालापासून आहे. तप आणि ज्ञान यामुळे नवीन कर्माचा प्रवाह खंडित होतो. आणि संचित कर्माचा नाश होऊन आत्मा मुक्त होतो.

आत्मा बलवान की कर्म -

याचे उत्तर म्हणजे दोन्ही बलवान आहेत. दोघातही अनंत सामर्थ्य आहे. जीवातील सामर्थ्यामुळे तो कर्मापासून सर्वथा मुक्त होऊ शकतो.

वरवर पाहिले तर कर्मच बलवान दिसतात. पण अंतर्दृष्टीने विचार केला तर आत्माच बलिष्ठ आहे. कारण कर्माची स्वीकृती आत्म्याची आहे. तो कोळ्याप्रमाणे कर्माच्या जाळ्यात स्वतःच अडकला आहे. मनात आणले तर तो कर्मबंधनांना तोडून फेकू शकतो. कर्म कितीही शक्तिशाली असले तरी आत्मा त्यातून मुक्त होऊ शकतो.

लौकिक दृष्टीने पोलाद कठीण आहे आणि वायु मृदु. परंतु हे मृदु वायु पोलादाचे तुकडे तुकडे करतो, हे आपण पाहतो.

कर्म आणि त्याचे फळ -

संसारी जीव नवे नवे कर्मबंध निर्माण करतात. त्यांचे परिणामाच्या दृष्टीने दोन भाग केले आहेत. शुभ-अशुभ, पाप-पुण्य, कुशल-अकुशल. या दोन भेदांचा उल्लेख, जैन, बौध्द सांख्य, योग, न्याय, वैशेषिक आणि उपनिषदात केलेला आहे. ज्या कर्मोचे फल सुखकारी होते ते पुण्य आणि ज्याचे फल दुःखदायी किंवा प्रतिकूल असते ते पाप. पुण्य फलाची सर्वच इच्छा करतात. पण पाप फलाची कोणीच इच्छा करीत नाही-पण त्यापासून वाचूही शकत नाही.

जीवाने जे कर्मबंध तयार केलेत त्याचे फल त्याला या जन्मी किंवा पुढील जन्मी भोगावेच लागते. कृतकर्माचे फळ-भोगल्याशिवाय आत्म्याला मुक्ती नाही.

महात्मा बुध्द म्हणतात, अंतराळात जा, किंवा समुद्राच्या पोटात दडून बसा किंवा गुहेत लपून बसा. तुमच्या पाप कर्माच्या फलांच्या उपभोगापासून तुम्हाला वाचवू शकेल असा प्रदेश नाही.

वेदापंथी कवि सिहलन मिश्र म्हणतात, कुठेही जा, परंतू जन्मजन्मांतरी शुभाशुभ कर्माचे फल सावलीसारखे तुमच्या बरोबरच राहील. ते तुम्हाला कधीच सोडणार नाही. आचार्य अमितगति म्हणतात, आमच्या पूर्वकर्माचीच फळे आम्ही भोगतो. दुस-यांनी दिलेल्या फळांचा उपभोग घेतला तर आम्ही स्वतःकेलेली कर्मे व्यर्थ जातील.

अध्यात्मशास्त्राचे प्रकांडपंडित आचार्य कुंदकुंददेखील हेच सांगतात- जीव आणि कर्मपुद्गल परस्पराशी एकजीव झालेले आहेत. पण योग्यवेळी ते निरनिराळे होतात. जोपर्यंत

जीव आणि पुद्गल परस्परात मिसळले असतात तोवर कर्म सुखदु:ख देतात आणि जीवाला ते भोगावे लागतात.

आत्मा स्वतंत्र की कर्माच्या आधीन -

मागे सांगितले आहे की जीवाला त्याच्या कर्माप्रमाणे शुभाशुभ फळे मिळतात. कर्माच्या दोन अवस्था असतात. एक बंध म्हणजे ग्रहण आणि उदय म्हणजे फळ. कर्म बांधण्यासाठी जीव स्वतंत्र आहे. परंतु फल भोगण्यासाठी तो स्वतंत्र नाही. कर्माच्या आधीन आहे.

ज्याप्रमाणे एखादा मनुष्य झाडावर स्वत:च्या इच्छेने चढू शकतो. पण गैरसावधपणाने तो जर खाली पडला तर ते पडणे त्याच्या स्वाधीन नाही. तो पडण्याची इच्छा करीत नाही. परंतु तो पडतो म्हणून पडण्याच्या बाबतीत तो परतंत्र आहे. भांग पीणे माणसाच्या हातात असते. परंतु तिचा परिणाम भोगणे त्याच्या हातात नसते. त्याची इच्छा नसली तरी भांग त्याच्यावर आपला प्रभाव पाडल्याशिवाय राहणार नाही. तेथे त्याच्या इच्छेचे काही चालत नाही.

याचाच अर्थ असा की कर्माचा बंध जरी मनुष्याच्या हातात असला तरी त्याच्या प्रतिकारासाठी औषध घेतले तर त्याच्या नशेचा प्रभाव कमी करता येतो. आणि नष्ठही करता येतो. त्या अवस्थेत कर्म उत्पन होऊन त्याची निर्जरा होते. त्याचा मर्यादित काल कमी करून शीघ्र उदयदेखील करता येतो. निश्चित काळाच्या आधी कर्माच्या उदयाला 'उदीरणा' म्हणतात.

पातंजल योगात उद्दष्टजन्य वेदनीय कर्माच्या तीन गती सांगितल्या आहेत. त्यात एका गतीसंबंधी सांगताना म्हटले आहे, " पुष्कळशी कर्मे फळ दिल्याशिवाय प्रायश्चिताद्वारे नाहीशी करता येतात. याला जैन धर्म 'प्रदेशोदय' म्हणतो.

कर्माची पुद्गलता -

इतर दार्शनिक कर्माला संस्कार आणि वासना मानतात. पण जैन धर्म त्याला पुद्गल मानतो. कर्म आत्म्याचा गुण नाही, परंतु आत्म्याच्या गुणाचा नाश करणारा आहे. परतंत्र बनविणारा आणि दु:खाचे कारण आहे. ज्या वस्तुचा जो गुण असतो त्याचा नाश होऊ शकत नाही. कर्म आत्म्याच्या गुणांचा नाश करणारा आहे म्हणून तो आत्म्याचा गुण होऊ शकत नाही. कर्म पौद्गलिक नसते तर ते आत्म्याला घातक बनले नसते. जैनदर्शनाप्रमाणे कर्म पुद्गल

आहे. पुद्गल मूर्तच असते. त्यात रूप, रस, गंध व स्पर्श हे चार गुण असतात. कारण पुद्गल तर कार्यदेखील पुद्गलच. उदा. कापूस, कापूस. हा भौतिक असल्यामुळे त्यापासून तयार होणारे वस्त्रदेखील भौतिकच असते. कार्यावरून कारणाचे आणि कारणावरून कार्याचे अनुमान करता येते. शरीर इ. कार्य पुद्गल आणि मूर्त आहे. म्हणून त्याचे कारण कर्मदेखील पुद्गलच होय.

मूर्त आणि अमूर्ताचा प्रभाव -

कर्म मूर्त आहे तर अमूर्त अशा आत्म्यावर त्याचा प्रभाव कसा पडतो? जसे मद्य आणि क्लोरोफार्म अमूर्त चेतनेवर प्रभाव पाडतात तसेच मूर्त कर्माचा प्रभाव अमूर्त आत्म्यावर पडतो.

याचेच स्पष्टीकरण आणखी कसे करता येईल. अनंतकालापासून आत्मा कर्माने बध्द असल्यामुळे स्वभावतः अमूर्त असूनदेखील संसारी अवस्थेत तो मूर्त आहे. म्हणून देखील तो कर्मामुळे प्रभावित होतो. जो आत्मा कर्मापासून मुक्त आहे, त्याला कर्म बांधूच शकत नाही. पूर्व-कर्मानी बांधल्या गेलेला जीव नवीन कर्माचा बंध करतो.

गौतमाने महावीरांना प्रश्न विचारला होता "भगवान, दु:खी जीव दु:खाने स्पर्शीला जातो की, अदु:खी दु:खाने स्पर्शीला जातो."

यावर भगवंतानी उत्तर दिले - गौतमा, दु:खी जीवच दु:खाने स्पर्शीला जातो. अदु:खी नाही . दु:खाचा स्पर्श, पर्यादान, (ग्रहण) उदीरणा, वेदना आणि निर्जरा दु:खी जीवच करु शकतो, अदु:खी नाही.

गौतम - भगवान कर्माचा बंध कोण करतो? संयमी, असंयमी की दोघेही.

भगवान-सर्वच लोक कर्माचा बंध करता. याचे तात्पर्य असे की कर्मानेयुक्त असलेला आत्माच कर्मबंधन करू शकतो. व त्यावर कर्माचा प्रभाव पडतो.

कर्मबंधाची कारणे - जीवाबरोबर कर्माचा अनादी संबंध आहे. परंतु कर्म कोणत्या कारणामुळे बंध करू शकते हाही एक प्रश्न उद्भवतो. त्याचे समाधान असे करता येईल- ज्ञानावरण कर्माच्या तीव्र उदयाने, दर्शनावरणीय कर्माच्या तीव्र उदयाने, दर्शन मोहाचा उदय होतो. दर्शन मोहाच्या तीव्र उदयाने जीव आठ कर्मांचा बंध करतो.

स्थानांग आणि समवायांगामध्ये आणि उमास्वामींनी तत्त्वार्थामध्ये कर्मबंधाची पांच कारणे सांगितली आहेत. मिथ्यात्व, अविरति, प्रमाद, कषाय आणि योग . परंतु योग व कषाय हीच कर्मबंधाची प्रमुख कारणे आहेत.

प्रकृति, स्थिती आणि अनूभाग आणि प्रदेश हे कर्मबंधाचे चार प्रकार आहेत. यापैकी प्रकृती आणि प्रदेशाचा बंध योगामुळे होतो. स्थिती आणि अनुभागाचा बंध कषायाने होतो. थोडक्यात सांगयचे तर कषाय कर्मबंधाचे मुख्य कारण आहे. कषायाच्या अभावी सांपरायिक कर्माचा बंध होत नाही. दहाव्या गुणास्थानापर्यंत दोन्ही कारणरूप असतात. म्हणून तेथे सांपरायिक बंध होतो. कषाय आणि योगाने सांपरायिक बंध होतो आणि गमनागमन इ. क्रियांनी होणा-या बंधाला इर्यापथिक बंध म्हणतात. ईर्यापथ कर्माची स्थिती उत्तराध्ययन प्रज्ञापनेमध्ये दोन समया इतकी मानली आहे. आणि पंडित सुखलालजी एक समयाइतकी मानतात. योग होऊन देखील कषाय भाव असेल तर उपार्जित कर्माची स्थिती किंवा रसाचा बंध होत नाही. स्थिती आणि रस दोन्हीच्या बंधाचे कारण कषायच आहे.

क्रोध, मान, माया आणि लोभ हे कषायाचे चार भेद आहेत. स्थानांग आणि प्रज्ञापनेमध्येही चारही कर्मबंधाची कारणे सांगितली आहेत. परंतु राग आणि द्वेष हे कषायाचे मुख्य दोन भेद होत. राग - द्वेषामध्येच बाकीच्या चारींचा समावेश होतो. रागामध्ये माया, लोभ, आणि द्वेषामध्येच बाकीच्या चारींचा समावेश होतो. रागामध्ये माया, लोभ, आणि द्वेषामध्ये क्रोध आणि मानाचा समावेश होतो. राग-द्वेषामुळे अष्टकर्माचा बंध होतो. म्हणून राग-द्वेषाला भाव कर्म मानले पाहिजे. राग-द्वेषाचे मूळ मोहात आहे.

आचार्य हरिभद्र ज्या मनुष्याच्या शरीरावर तेल चोपडले असेल तर त्याच्या शरीरावर धूळ चिकटल्याशिवाय रहात नाही. तसेच राग-द्वोष भावनांनी लिप्त झालेल्या आत्म्यावर कर्मबंधाची धूळ चिटकते.

मिथ्यात्वाला जे कर्मबंधनाचे कारण मानले आहे त्यात देखील रागद्वेष प्रमुख आहे. रागद्वेषाच्या तीव्रतेने ज्ञान विपरीत होते आणि मिथ्यात्वामुळे इतरही कारणे निर्माण होतात. म्हणून शब्द जरी वेगवेगळे असले, तरी सर्वांचा अर्थ एकच आहे.

कर्मबंधाचे कारण मिथ्याज्ञान किंवा मोह आहे, हे न्यायदर्शनाला मान्य आहे. हा मोह केवळ तत्वज्ञानातून निर्माण झालेला नसून शरीर, इंद्रिया, मन, वेदना, बुध्दि हे आत्मा नसताना देखील त्याच्यात 'मीच-आहे,' हे ज्ञान मिथ्या असून तो मोह आहे. आणि तेच कर्मबंधन आहे.

ईश्वर आणि कर्मवाद -

जीवाला आपल्या कर्माप्रमाणेच फळ मिळते. कर्मफळाचे नियंत्रण करण्यासाठी ईश्वराची आवश्यकता जैनधर्माला मान्य नाही. कर्म परमाणूमध्ये जीवात्म्यामूळे एक विशिष्ट परिणाम उत्पन्न होतो. त्यामुळे तो द्रव्य, क्षेत्र,काळ, भव, गति, स्थिति इ. च्या उदयासाठी अनुकूल सामुग्रीने परिणाम-दर्शनासाठी समर्थ असलेल्या आत्म-संस्कारांना मलीन करतो. त्यामुळे फलाचा उपभोग घ्यावा लागतो. अमृत आणि विष, पथ्य आणि अपथ्य यांचे भोजनाचे वेळी काही ज्ञान होत नाही. परंतू आत्म्याशी संयोग झाल्यानंतर त्यांचा आपापल्या स्वभाव्‌प्रमाणे परिणाम घडतो. त्यांना संयोग्‌ झाल्यानंतर त्यांचा आपापल्या स्वभावाप्रमाणे परिणाम घडतो. त्यांना आपले कार्य करण्यासाठी कोणाची जरूरी नसते. ते आपला प्रभाव दाखविल्याशिवाय राहात नाहीत. तसेच कर्मदेखील आपला प्रभाव दाखविल्याशिवाय राहात नाही.

उदाहरणार्थ, गणित करणारी मशीन जड असली तरी ती आकडे मोजण्यात चुकत नाहीं. तसेच कर्म जड असले तरी फळ देण्यात चुकत नाही. म्हणून त्यासाठी ईश्वराला नियंता मानण्याची जरूरी नाही. जीवाचे कर्म असतील तसेच फळ ईश्वरदेखील देणार. कर्माच्या विरूध्द तो काहीही देऊ शकत नाही. एकीकडे ईश्वराला सर्वशक्तिमान मानून दुसरीकडे तो काही करु शकत नाही. असे मानणे हा ईश्वरचा उपहास आहे. यावरून हेच सिध्द होईल की कर्माची शक्ती ईश्वरापेक्षा मोठी आहे आणि ईश्वराचा उपहास आहे. आणि ईश्वर त्याच्या नियंत्रणाखाली काम करतो. दुसरीकडे ईश्वरालाच सर्व-कर्ता करविता मानून कर्मामध्ये काही करण्याची शक्ती नाही असे मानावे लागेल. कारण ही ईश्वराच्या सहाय्यानेच आपली फळे देऊ शकतात. अशाप्रकारे दोघेही एकमेकाच्या अधीन आहेत, असे मानावे लागेल. म्हणूनच कर्मालाच श्रेष्ठ मानणे अधिक योग्य होईल.

वैदिक दर्शन मानते की आत्मा हा परमेश्वराच्या हातातील खेळणी आहे. त्यात स्वत: काही करण्याची शक्ती नाही. त्याला स्वर्ग नरकात पोचविणारा, सुख-दु:ख देणारा ईश्वरच आहे. जैनदर्शनाला हा विचार मान्य नाही. ईश्वर कोणाची उन्नती, किंवा अधोगती करु शकत नाही. आत्मा स्वत:च आपली उन्नती किंवा अधोगती करणार आहे. जेव्हा तो विभावदशेत रममाण होतो तेव्हा त्याचे पतन होते. विभावदशेत रमणारा आत्मा वैतरणी नदी आणि कूटशाल्मली वृक्ष आहे, तर स्वभावदशेत विहारणारा आत्मा कामधेनु आणि नंदनवन आहे.

आत्मा स्वत:च सुख-दु:खाचा कर्ता आणि भोक्ता आहे. शुभमार्गाने जाणारा आत्मा मित्र, तर अशुभ मार्गाने जाणारा आत्मा शत्रू आहे.

जैन तत्वज्ञान्यांनी उच्च स्वरात सांगितले की सुखदु:खाचा कर्ता हा आत्माच आहे. तो जसे कर्म करेल तसेच फळ त्याला भोगावे लागेल.

आत्म्याला शरीरात बध्द ठेवणे हे कर्माचे मुख्य कार्य आहे. कर्मबंधाचा प्रवाह वाहत असतो तोपर्यंत आत्मा मुक्त होऊ शकत नाही. हे कर्मांचे सामान्य कार्य आहे. भिन्नभिन्न कर्म भिन्नभिन्न कार्य करतात. जितकी कर्मे तितकी कार्ये. जैन शास्त्राप्रमाणे कर्माच्या आठ मूळ प्रकृत्ती आहेत. त्या प्राण्याला अनुकूल किंवा प्रतिकूल फळ देतात. त्याची नांवे १) ज्ञानावरण २) दर्शनावरण ३) वेदनीय ४) मोहनीय ५) आयू ६) नाम ७) गोत्र ८) अंतराय ही होत. त्यांचेही घाती, अघाती असे दोन भेद आहेत. ज्ञानावरण, दर्शनावरण, मोहनीय आणि अंतराय हे चार घाती कर्म, तर वेदनीय, आयु, नाम, गोत्र ही अघाती कर्मे होत.

जे कर्म आत्म्याशी बध्द होऊन त्याचे स्वरूप किंवा स्वाभाविक गुण यांचा नाश करते ते घाती कर्म. यांच्या परिपाकाचा सरळ परिणाम आत्म्यावर होतो. यामुळे गुणांचा विकास थांबतो. जसे तेजस्वी सूर्याला ढग झाकळून टाकतात. त्याच्या किरणांना बाहेर येऊ देत नाही, तसे हे घाती कर्म आत्म्याचे मुख्य गुण अनंत ज्ञान, अनंत दर्शन अनंत सुख आणि वीर्य या गुणांना प्रकट होऊ देत नाहीत. ज्ञानावरणीय कर्म जीवाच्या अनंतज्ञान शक्तीला प्रकट होऊ देत नाहीत. दर्शनावणीय कर्म आत्म्याच्या अनंत दर्शनाचा उदय होऊ देत नाही. मोहनीय कर्म आत्म्याच्या सम्यक् श्रध्दा, सम्यक् चारित्र या गुणांना अडविते. त्यामुळे आत्मा अनंत सुख प्राप्त करु शकत नाही. अंतराय कर्म आत्म्याच्या अनंत वीर्य शक्तीचा विकास होऊ देत नाही. अशाप्रकारे घाती कर्म आत्म्याच्या वेगवेगळ्या गुणांचा घात करतात.

जे कर्म आत्म्याच्या गुणांचा नाश न करता त्याच्या प्रतिजीवी गुणांचा नाश करतात ते अघाती कर्म होय. अघाती कर्माचा संबंध पुद्गल द्रव्याशी असतो. सरळ आत्म्याशी नसतो. अघाती कर्मामुळेच आत्मा पुद्गलाशी जोडला जातो. त्यामुळेच आत्मा 'अमूर्तोSपि मूर्त इव' बनतो . त्याला शरीराच्या कैदेत रहावे लागते.त्यामुळे तो अव्याबाध सुख, अनिर्बंध अवगाहन व अगुरू लघुत्व हे आत्म्याचे गुण प्रकट होऊ देत नाही. वेदनीय कर्म आत्म्याच्या अव्याबाध सुखाच्या आड येते. आयुकर्म आत्म्याची अवगाहना चिरकाल टिकू देत नाही. नामकर्म आत्म्याच्या अरूप अवस्थला झाकळून टाकते. गोत्रकर्म अगुरुलघुत्वाला अडथळा आणते. अशा

प्रकारे अघाती कर्माचा प्रभाव पडतो. घाती-कर्म नष्ट झाल्यावर आत्मा केवल ज्ञान व केवलदर्शनाने युक्त होऊन आरिहन्त बनतो. अघाती कर्म नष्ट झाल्यावर तो विदेही, बुध्द आणि मुक्त होतो.

ज्ञानावरण कर्म -

जीव चैतन्ययुक्त आहे. उपयोग हे त्याचे लक्षण आहे. उपयोग म्हणजे ज्ञान-दर्शन. ज्ञान हे साकारोपयोग तर दर्शन हे निराकारोपयोग. जात, गुण, क्रिया इ. विशेष धर्मांचा बोध होतो तो दर्शनोपयोग. ज्या कर्मामुळे ज्ञानोपयोग आच्छादित होतो ते ज्ञानावरण कर्म. आत्म्याच्या तेजस्वी स्वभावाला झाकून टाकणा-या या कर्माची तुलना डोळ्यावर बांधल्या जाणा-या झाकून टाकणा-या कर्माची तुलना डोळ्यावर बांधल्या जाणा-या पट्टीबरोबर केली आहे. डोळ्यावर कापडाची पट्टी बांधली तर डोळे पाहू शकत नाही. तसेच ज्ञानावरण कर्मामुळे आत्मा सर्व पदार्थांची सम्यक्ता पाहू शकत नाही. त्याची जाणून घेण्याची शक्ती झाकली जाते.

दर्शनावरण कर्म -

पदार्थाचे सामान्यत्त्व ग्रहण न करणे म्हणजे दर्शनावरण. पदार्थाचे सामान्य गुण ते नजरेत भरू देत नाही. दर्शनगुणाला जर मर्यादा घातली गेली तर ज्ञान मिळविण्याचा मार्गच बंद होतो. त्याची तुलना राजाच्या भेटीला जाणा-याला अडविणा-या द्वारपालबरोबर केली आहे. दर्शनावरणाचे, चक्षु, अचुक्षु, अवधी, केवल-दर्शनावरण, निद्रा, निद्रानिद्रा, प्रचला, प्रचला-प्रचला, स्त्यानगृध्दी असे नऊ प्रकार आहेत. त्यापैकी केवलदर्शनावरण हे सर्वघाती आहे.

वेदनीय कर्म-

आत्म्याच्या अव्याबाध गुणाला झाकळून टाकणारे कर्म वेदनीय कर्म होय. त्याचे साता, असाता असे दोन भाग आहेत. साता वेदनीयामुळे मनुष्याला भौतिक सुख मिळते, तर असाता कर्मामुळे मानसिक व शारीरिक दु:ख होते.

मोहनीय कर्म -

आत्म्याला मूढता आणणा-या कर्माला मोहनीय कर्म म्हणतात. इतर सात कर्मांचा हा राजा आहे. हा आत्म्याचे वीतराग-रूप विकृत करतो. त्यामुळे तो रागद्वेषादी विकारांनी ग्रस्त होतो. हे कर्म स्वपरविवेक आणि स्वत-चे रुपामध्ये रमण्याच्या कार्यात अडथळा आणते. याची तुलना मदिरापानाबरोबर होऊ शकेल. मदिरापानाने मनुष्य स्वत:चे स्वरूप विसरुन जातो. हिताहिताचे त्याला ज्ञान रहात नाही. तसेच मोहकर्मामुळे मनुष्य तत्व अतत्व, भेद-विज्ञान जाणू शकत नाही. उलट सांसारिक गोष्टीत गढून जातो. मोहनीय कर्माचे दर्शन मोहनीय आणि चारित्र्यमोहनीय असे दोन प्रकार आहेत.

आयुकर्म -

जीवनकाळाला नियंत्रित करणारे हे कर्म होय. यामुळे मनुष्य जिवंत राहतो व याचा नाश झाल्यावर मृत्यू येतो. याची तुलना तुरूंगाबरोबर केली आहे. जज्ज गुन्हेगाराला त्याच्या अपराधाप्रमाणे शिक्षा देऊन तुरुगांत टाकतो. कैद्याची इच्छा असो वा नसो , तेवढा काल त्याला तेथे काढावाच लागतो. तसेच आयुष्य संपल्याशिवाय या देहरूपी तुरुंगातून सुटका होत नाही.

नामकर्म -

यामुळे जीवाला गति इ. पर्यायाचा अनुभव घेण्यासाठी बाध्य केले आहे. चतुर चित्रकार आपल्या कल्पनेने मनुष्य, पशु, पक्षी इ. चित्र काढतो तसेच हे नामकर्म नरक, तिर्यंच, मानव, देव इ. शरीर रचना करतो. याचेही शुभ आणि अशुभ असे दोन प्रकार आहेत.

गोत्रकर्म -

या कर्मामुळे जीवाला उच्च-नीच गोत्र प्राप्त होते.

अंतराय कर्म -

याच्या उदयाने सामर्थ्य मिळविण्यात अडथळा येतो. याची तुलना राजाच्या कोषाधिका-याबरोबर केली आहे. राजाची आज्ञा झाली तरी तो दान देण्याची टाळाटाळ करतो. तसे हे कर्म दान, भोग, उपभोग आणि वीर्य (पराक्रम) यात अडथळा आणते.

कर्मबंध-

कर्मवर्गणेचे पुद्‌गल परमाणू नाहीत असे कोणतेही स्थान नाही. मन, वचन, कायेने प्रेरित होऊन मनुष्य कार्य करीत असतो. कषायामुळे संतापतो. म्हणून कर्मबंध होण्यायोग्य पुद्‌गलांचे तो सर्व दिशांनी ग्रहण करीत असतो. एकेंद्रिय जीवदेखील व्याघात झाला नाही तर दहा दिशांनी कर्मग्रहण करतात. आणि व्याघात झाला तर कधी तीन, कधी पाच तर कधी चार दिशांनी कर्मग्रहण करतात. बाकीचे जीव सर्व दिशांनी कर्मग्रहण करतात. परंतु क्षेत्राच्या बाबतीत मात्र मर्यादा आहे. ज्या क्षेत्रात तो राहतो त्याच क्षेत्रातील कर्म पुद्‌गल तो ग्रहण करतो. दुसरीकडील नाही. योगाच्या चंचलतेवर ते अवलंबून आहे. योगाची प्रवृत्ति मंद असेल तर पुद्‌गल ग्रहणाचे प्रमाण मंद राहील. आगमात यालाच प्रदेश म्हटले आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की आत्म्याचे असंख्य प्रदेश असतात आणि प्रत्येक प्रदेशातून अनंत कर्मबध्द होणे म्हणजे प्रदेश बंध होय. म्हणजेच जीवाच्या प्रदेशांचा आणि कर्मपुद्‌गलांच्या प्रदेशांचा संयोग म्हणजेच प्रदेश बंध होय.

योगाच्या पुवृत्तीने ग्रहण केलेले कर्मपरमाणू ज्ञान व दर्शनाला झाकळून टाकणे, सुख-दु:खाचा अनुभव देणे इ. विविध प्रकृतीत परिणमित होतात. आत्म्याबरोबर बध्द झाल्यामुळे पूर्वी कार्माण वर्गणेमुळे जे पुद्‌गल एकरूप होते त्यात अनेक प्रकारचे स्वभाव उत्पन्न होतात. यालाच आगमाने प्रकृति बन्ध म्हटले आहे.

प्रदेश आणि प्रकृति बन्ध हे यौगिक प्रवृत्तीमुळे होतात. केवळ यौगिक प्रवृत्तीमुळे होणारे बंध हे कोरड्या भिंतीवर प्रहार करणा-या वाळू प्रमाणे आहेत. कषायरहित प्रवृत्तीने होणारे कर्मबंध निर्बळ, अशक्त आणि नाममात्र असतात. त्यांचा प्रभाव फारसा टिकत नाही.

निश्चित काळापर्यंत आत्म्यापासून दूर न होण्याची कालाची मर्यादा पुद्‌गलामध्ये निर्माण होते. याला आगमात स्थितीबंध म्हणतात. आत्म्याने ग्रहण केलेले ज्ञानावरण इ. कर्माच्या पुद्‌गलांच्या राशींचा आत्म्यामध्ये राहणाच्या कालमर्यादेला स्थितीबंध म्हणतात.

जीवाच्या शुभाशुभ कर्मांचा मंद किंवा तीव्र परिणाम म्हणजे अनुभागबंध होय. उदयाला आलेल्या कर्माचा परिणाम तीव्र आहे की मंद आहे हे ठरविणारा अनुभागबंध होय.

बंध केलेले कर्म उदयास येतातच. परंतु अनुकूल कारण न मिळाल्यामुळे पुष्कळसे कर्म उदयाला येऊन फळ न देताच नाहीसे होतात. कर्मबन्ध आणि कर्मोदय यांच्या मधल्या काळाला आबाधा काळ म्हणतात. शुभकर्माचे फळ सुखकारक आणि अशुभ कर्माचे दु:खदायक असते हे

मागे सांगितलेच आहे. पण कधी कधी काही शुभकर्मांचे फळ दु:खकारक असते तर काही अशुभ कर्माचे फळ देखील सुखकारक असते.

कर्मबंधनातून सुटण्याचा मार्ग -

तप आणि ज्ञान साधनेने मनुष्य मुक्त होऊ शकतो. खाणीत माती आणि सोने एकमेकात मिसळून गेलेले असते. परंतु तापवल्यानंतर सोने वेगळे दिसते. तसेच सम्यक्दर्शन, सम्यक्ज्ञान, सम्यक् चारित्र्य यांनी आत्मा शुध्द होते. ज्ञान आणि क्रिया, आचार आणि विचार दोन्हीचा समन्वय मोक्षाला कारण होतो. चारित्र्यहीन ज्ञान हे चंदनाचे ओझे वाहणा-या गाढवाप्रमाणे आहे. म्हणून तीन्हींचा समन्वय-सम्यक् दर्शन, सम्यक्ज्ञान व सम्यक्चारित्र, हेच मोक्षमार्गाचे साधन आहे.

बध्द कर्मातून मुक्त होण्यासाठी साधक प्रथम संवराची साधना करून नवीन कर्मबंधांना अडवितो. आचार्य हेमचंद्र म्हणतात - "चौरस्त्यावर पुष्कळ दारे असलेल्या घराची दारे बंद केली नाही तर निश्चितच धूळ शिरते आणि चिकटपणामुळे ती तेथेच चिटकते." पण दार बंद असेल तर ती आत शिरत नाही आणि चिटकत नाही.

अशाप्रकारे साधक येणा-या कर्माला संवराने अडवून निर्जरने पूर्वकर्माचा नाश करतो. कर्माचे आत्म्यापासून दूर होणे म्हणजे निर्जरा आणि जेव्हा संपूर्ण कर्माची निर्जरा होते तेव्हा साधक मुक्त होतो. एकदा आत्मा कर्मबंधनातून मुक्त झाल्यावर पुन: त्यात अडकत नाही. कारण त्या अवस्थेत कर्मबंध होण्याची स्थितीच राहत नाही. बीजच जर जळून गेले तर त्यातून अंकूर उगवूच शकणार नाही. म्हणून कर्मबीजाचा नाश झाल्यावर संसाररूपी अंकूर उगवू शकणार नाही.

कर्मवादाचा सिध्दान्त ही जैनधर्माने तत्वज्ञानाच्या विश्वाला दिलेली एक अपूर्व देणगी आहे. या सिध्दान्ताने माणसाला ध्रुवता-या प्रमाणे अनुकूल-प्रतिकूल परिस्थितीत मार्गदर्शनाचे काम केलेले आहे. ध्रुवाप्रमाणे अटल राहण्याचे प्रेरणा केली आहे.

भारतीय दर्शनामध्ये कर्मवादाचा सिध्दांत अद्‌भुत, अनन्य आणि अपराजेय आहे. आजच्या विज्ञानयुगात देखील तो एक चिरंतन ज्योतीप्रमाणे मानवाचा मार्ग प्रकशित करु शकतो.